# निशाणी क्र. ८९ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ याने त्याचेविरूध्द् झालेला विना कैफियतीचा आदेश रद्द होवून कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार प्रस्तुत दाव्याचे कामी वादीने दाव्यात दुरूस्ती केल्यानंतर त्याला त्याच्या वकिलांना वैयक्तिक अडचणीमुळे भेटता आले नाही व त्याला आवश्यक ती माहिती देता आली नाही. तसेच दुरूस्ती दाव्यासंदर्भात त्याला कैफियत मांडण्याकरिता आवश्यक ती माहिती वकिलांना वेळेत देता आली नाही. त्यामुळे त्याला वेळेत त्यांची कैफियत मांडता आली नाही. त्यामुळे त्याच्याविरूध्द् विना कैफियत आदेश झालेला आहे. त्याने त्याची कैफियत देण्यास जाणीवपुर्वक विलंब केला नाही. वरील कारणास्तव त्याला कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून त्याचेविरूध्द् झालेला विना कैफियतचा आदेश रद्द होवून कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत त्याने विनंती केली आहे.

२. वादीने सदर अर्जास नि.९१ ला म्हणणे दाखल करून अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार अर्जातील मजकूर खोटा व खोडसाळ आहे. प्रतिवादीने मुदतीत कैफियत दाखल न करण्याचे कोणतेही योग्य व संयुक्तिक कारण दिले नाही. प्रतिवादी विरूध्द् विना कैफियत आदेश कधी झाला याचा उल्लेखही केला नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती वादीने केली आहे.

३. उभय पक्षकारांतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. प्रस्तुत प्रतिवादी याने अर्जाचे पुष्ठयर्थ शपथपत्र सादर केले आहे. यावरुन अर्जातील नमूद कारण योग्य आहे असे मानता येईल. वादीने

प्रस्तुतचा दावा कायम मनाईकरिता दाखल केला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादीस कैफियत सादर करण्याची संधी देणे न्यायोचित वाटते. मात्र, झालेल्या विलंबाबाबत त्याने वादी यास खर्च देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे :

## — **आदेश** —

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत प्रतिवादी याला कैफियत दाखल करण्यास खालील अटीवर परवानगी देण्यात येते.

३. प्रतिवादी क्र.१ याने पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम रुपये ५००/— दयावी. त्याने त्यापैकी रक्कम रुपये २५०/— वादी यास दयावी व उर्वरित रक्कम सरकार जमा करावी.

सही/—
( गि. सु. माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

स्थळ : देवगड
दिनांक : २४/०१/२०१८